(8)

जाक्र/प्राशि/खाप्राशा/अति.तुकडी/ ८८६ /१३
कार्यालय, शिक्षण विभाग (प्राथ) जि. प. वाशिम.
दिनांक :- २०/०३/२०१३

## आदेश

आदेश क्र. प्राथ/क/परवानगी/१७२०३/कार्यालय, शिक्षण उपसंचालक, अमरावती दिनांक ४ जून २००९ अन्वये वर्ग १ ला सन २००५ पासून कायम विना अनुदान तत्वावर परवानगी प्रदान केल्यानंतर सदर शाळेमध्ये प्रत्यक्ष वर्ग सुरु केल्यामुळे वर्ग १ ते ७ नैसर्गिक वाढीने निर्माण झाल्यामुळे सन २०१२-१३ मध्ये आवश्यक तेवढी पटसंख्या उपलब्ध असल्यामुळे खालील विवरण प्रमाणे अटींच्या अधीन राहून खालीलप्रमाणे अतिरिक्त तुकड्यांना कायम विना अनुदान तत्वावर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अक्र | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | वर्ग | वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री शंकरलाल हेडा एज्यकेशन व मल्टीपर्पस सोसायटी, वाशिम | हॅपी फेसेस व कन्सेप्ट स्कुल, वाशिम, ता.जि. वाशिम | इंग्रजी | वर्ग १ ला अतिरिक्त तुकडी | सन २०१२-१३ पासून कायम विना अनुदान तत्वावर |
| २ | | | | वर्ग २ रा अतिरिक्त तुकडी | |
| ३ | | | | वर्ग ३ रा अतिरिक्त तुकडी | |
| ४ | | | | वर्ग ४ था अतिरिक्त तुकडी | |

अटी व शर्ती :-

१. सदर वर्गाला मान्यता कायम विना अनुदान तत्वावर देण्यात येत आहे.
२. सदर वर्ग तुकड्या सह प्रशिक्षित शिक्षक व वयोमर्यादीत शिक्षकांची नेमणूक रोस्टर प्रमाणे करणे आवश्यक आहे.
३. सदर वर्ग खोल्यामध्ये स्वतंत्र खोल्या व भौतिक सुविधा असणे आवश्यक आहे.
४. अनधिकृत वर्ग सुरु करु नये. तुकड्या पटसंख्या कमी असल्यास मान्यता कमी करण्यात येईल.
५. जादा प्रवेश, अनधिकृत प्रवेश देवू नये.
६. आरटीई ॲक्ट २००९ मधील तरतुदींची अंमलबजावणी बंधनकारक राहील.

--- स्वा/---
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, वाशिम

प्रतिलिपी :-

१. मा. शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांना माहिती करीता सविनय सादर.
२. अध्यक्ष/सचिव, श्री शंकरलाल हेडा एज्यकेशन व मल्टीपर्पस सोसायटी, वाशिम यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव रवाना.
३. मुख्याध्यापक, हॅपी फेसेस व कन्सेप्ट स्कुल, वाशिम, ता.जि. वाशिम यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव रवाना.

शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, वाशिम

HAPPY FACES * The Concept School * CBSE Affi. No.1130460 WASHIM

GAJANAN S. MOHALE
General Manager
Happy Faces The Concept School
[CBSE Aff.No.1130460] Washim

PRAVIN M. NASKARI
Principal
Happy Faces The Concept School
[CBSE Affi.No.1130460] WASHIM

वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक क्वीएलएस/१००२ /१०००/०२/प्राशि-३ दिनांक २३ सप्टेंबर २००३
२) शासन परिपत्रक क्र. क्वीएलएस/१००३/५११/०३/प्राशि-३ दिनांक २४ मार्च २००५

जा.क्र/जिपवा/प्राशि/आस्था/खाप्राशा/८९६/२०१०
कार्यालय शिक्षण विभाग (प्राथ.) जि.प.वाशिम
दिनांक :-२० / ३ /२०१०

## आदेश.

आदेश क्रमांक प्राथ/क/परवानगी/१७०३/ कार्यालय शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती दिनांक- / /२०१० या आदेशान्वये खालील वर्गांना वर्ग १ ला सन २००५-०६ पासून परवानगी प्रदान केल्यानंतर व त्याच आदेशातील मुद्दा क्र. १२ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार सदर शाळा ही प्रत्यक्षात सन २००४-०५ पासून सुरु केल्याने सन २००४-०५ मध्ये वर्ग १ ला येत असल्याने व सदर शाळेने रु. १००/- दंडाची रक्कम बँकेत भरल्याने व खालील वर्ग नैसर्गीक वाढीने निर्माण झाल्यामुळे आवश्यक तेवढी पटसंख्या उपलब्ध असल्यामुळे खालील विवरण प्रमाणे अटीच्या अधिन राहून नैसर्गिक वाढीने कायम विना अनुदान तत्वावर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र | संस्थेचे नांव | शाळेचे नांव | माध्यम | वर्ग | वर्षे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. शंकरलाल हेडा एज्युकेशन सोसायटी अँन्ड मल्टीपरपज सोसायटी वाशिम ता.जि. वाशिम | हॅपी फेसेस दी कन्सेप्ट स्कुल वाशिम | इंग्रजी | इ. २ री प्रथम तुकडी | २००५-०६ |
| | | | | इ. ३ री प्रथम तुकडी | २००६-०७ |
| | | | | इ. ४ थी प्रथम तुकडी | २००७-०८ |
| | | | | इ. ५ वी प्रथम तुकडी | २००८-०९ |
| | | | | इ. ६ वी प्रथम तुकडी | २००९-१० |

१) सदर वर्गाला मान्यता कायम विना अनुदान तत्वावर देण्यात येत आहे.
२) सदर वर्ग तुकडया सह प्रशिक्षीत शिक्षक व वय मर्यादीत शिक्षकांची नेमणूक रोष्टर प्रमाणे करणे आवश्यक आहे.
३) सदर वर्ग खोल्यासाठी स्वतंत्र खोल्या व भौतीक सुविधा करणे आवश्यक आहे.
४) अनाधिकृत वर्ग सुरु करु नये तुकडया पटसंख्या उपस्थिती कमी झाल्यास मान्यता कमी करण्यात येईल.
५) जादा प्रवेश, अनाधिकृत प्रवेश देऊ नये.

स्वा/-
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद,वाशिम

प्रतिलीपी :-
१) मा. शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांना माहिती करीता सादर.
२) मुख्याध्यापक हॅपी फेसेस दी कन्सेप्ट स्कुल वाशिम यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव रवाना.

GAJANAN S. MOHALE
General Manager
Happy Faces The Concept School
[CBSE Aff.No.1130460] Washim

PRAVIN M. NASKARI
Principal
Happy Faces The Concept School
[CBSE Affi.No.1130460] WASHIM

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद,वाशिम

महाराष्ट्र शासन

**शासन परवानगी आदेश**

क्रमांक-इंमाशा २०१२/( १८/१२)/माशि-१,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२,
दिनांक:- २१/०२/२०१२

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे.

**विषय :-** इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ. ८ वी ते इ. १० वी चे इंग्रजी माध्यमाचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ :-**
१) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१०.३.२०१०.
२) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१४/१०/२०१०
३) संस्थेचा दि.१७/१२/२०११ रोजीचा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे.

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, श्री.शंकरलाल हेडा एज्युकेशन ॲन्ड मल्टिपर्पज सोसायटी, वाशीम या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या हॅप्पी फेसेस द कॉन्व्हेंट स्कूल, करसबे, वाशीम येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ. ८ वी ते इ. १० वीचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्रा करिता (प्रथम प्रोव्हीजनल व नंतर रेग्युलर) अर्ज करणे आवश्यक राहील.
२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन) आवश्यक असणाऱ्या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.
३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता(रेग्युलर ॲफीलीएशन)निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.
४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणाऱ्या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
६) परवानगी देण्यात आलेल्या इ. ८ ते १० वीच्या वर्गांमध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.
७) परवानगी आदेशाच्यावेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

सं.पु.खोरगडे
( सं.पु.खोरगडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
मा.मंत्री(शाशि) यांचे खाजगी सचिव /मा.राज्यमंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव
विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती / शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, वाशिम सचिव, श्री.शंकरलाल हेडा एज्युकेशन ॲन्ड मल्टिपर्पज सोसायटी, वाशीम
निवड नस्ती, माशि-१.

GAJANAN S. MOHALE
General Manager
Happy Faces The Concept School
[CBSE Aff.No.1130460] Washim

PRAVIN M. NASKARI
Principal
Happy Faces The Concept School
[CBSE Affi.No.1130460] WASHIM